MHKO140007392025

| | |
|---|---|
| दाखल तारीख | - २२/०९/२०२५ |
| नोंदणी तारीख | - २४/०९/२०२५ |
| निकाल तारीख | - १६/०३/२०२६ |
| कालावधी | - वर्ष महिने दिवस<br>००. ०५. २२ |

**चंदगड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,**
**चंदगड, जिल्हा. कोल्हापूर.**
**( पिठासीन अधिकारी : व्ही. एस. अग्रवाल )**

नियमीत दिवाणी दावा क्र. १७४/२०२५.                    **निशाणी क्र.१३**/अ.
CNR No. MHKO140007392025.

१. जगदीप दीपक माळी उर्फ कांबळे,
व.व. ३०, व्यवसाय- हॉटेल व्यवसाय,
रा. सुळये, ता. चंदगड, जि.कोल्हापूर.
२. संदीप दीपक माळी उर्फ कांबळे,
व.व. ३८, व्यवसाय- हॉटेल व्यवसाय,
रा. सदर.
३. प्रदीप दीपक माळी उर्फ कांबळे,
व.व. ३४, व्यवसाय- हॉटेल व्यवसाय,
रा. सदर.
४. मंगेश परशराम माळी उर्फ कांबळे,
व.व. ४९, व्यवसाय- शेती,
रा. सदर.
५. दशरथ परशराम माळी उर्फ कांबळे,
व.व. ४८, व्यवसाय- शेती,
रा. सदर.
६. रेणुका शामराव कांबळे,
व.व. ५५, व्यवसाय- शेती,
रा. बाची, ता. बेळगाव, जि. बेळगाव.
७. सरस्वती नारायण कांबळे,
व.व. ५४, व्यवसाय- शेती,
रा. सुळये, ता. चंदगड, जि. कोल्हापूर.
८. संगीता लक्ष्मण कांबळे,
व.व. ४५, व्यवसाय- शेती,
रा. उंभरी, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.
९. विजय नारायण कांबळे,
व.व. ४४, व्यवसाय- शेती,
रा. सुळये, ता. चंदगड, जि. कोल्हापूर.
(वादी नं.१ स्वत:करीता व वादी नं.२ ते ९ यांचे व.मु.)

} **वादी**

**//विरुध्द//**

| | | |
|---|---|---|
| १. | मे. जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी,<br>ग्रामपंचायत सुळये,<br>ता. चंदगड, जि. कोल्हापूर. | **प्रतिवादी** |

..............................................................................................................

**उपस्थिती-**

| | | |
|---|---|---|
| वादीतर्फे विधीज्ञ | - | श्रीमती. बी. जी. कांबळे. |
| प्रतिवादी क्र.१ ते ९तर्फे विधीज्ञ | - | - |

..............................................................................................................

**न्यायनिर्णय**

(निकाल तारीख १६/०३/२०२६)

प्रस्तुतचा दावा वादी यांनी हक्कज्ञापनासाठी दाखल केलेला आहे.

**वादीचे थोडक्यात कथन असे की,**

०२. वादी हे वर नमुद पत्यावर कायम रहिवाशी असून यातील वादी यांच्या घराण्याच्या वडिलोपार्जित शेतजमीन मिळकती मौजे सुळये, ता. चंदगड, जि. कोल्हापूर येथे आहे. कै. यल्लाप्पा निंगाप्पा कांबळे उर्फ माळी हे वादी नं.१ ते ३ यांचे चुलत आजोबा तसेच वादी नं. ४,५,६,७,८ व ९ चे सख्खे काका व वादी नं. ७ चे दीर आहेत. वादी नं.१ ते ३ यांचे चुलत आजोबा तसेच वादी नं.४,५,६,७,८,९ चे सख्खे काका व नं.७ चे दीर कै.यल्लाप्पा निंगाप्पा कांबळे उर्फ माळी हे दि.१५ जून १९८० रोजी सुळये येथील राहत्या घरातून सकाळी ११ च्या सुमारास बाहेरगावी जाऊन येतो असे सांगून निघून गेले ते आज अखेर परत आले नाहीत. वादी यांनी पै पाहुणे, नातेवाईक व मित्रमंडळी यांच्याकडे शोध घेतला परंतू ते कोठेही आढळून आले नाहीत. वादी हे अशिक्षीत व कायदयाचे ज्ञान नसल्याने त्यांना त्याबाबतच्या पोलीस स्टेशनला वर्दी दिलेली नाही तसेच त्यांचे फोटो संग्रहित नसल्यामुळे पोलीस स्टेशनला जाऊन वर्दी देणे शक्य झाले नाही.

०३. यातील वादी नं.१ ते ३ यांचे चुलत आजोबा तसेच वादी नं.४,५,६,७,८,९ चे सख्खे काका व वादी नं. ७ चे दीर यांनी आजपर्यंत आपल्या कै. यल्लाप्पा निंगाप्पा कांबळे उर्फ माळी यांचा ठिकठिकाणी संपर्क करुन शोध घेण्याचा आटोकाट प्रयत्न केला

परंतू ते अदयाप पर्यंत मिळून आलेले नाही अगर ते स्वत:हून घरी परत आलेले नाही. त्यामुळे सन १९८० पासून आज अखेर शोध घेवूनही ते नातेवाई, पे-पाहूणे अगर मित्रमंडळी तसेच गावातील कोणासही मिळून आलेले नाहीत व निदर्शनाास आलेले नाही. यल्लाप्पा निंगाप्पा कांबळे उर्फ माळी हे गेल्या १५ वर्षापेक्षा अधिक काळापासून बेपत्ता असलेमूळे ते दिवाणी मृत आहेत. असे त्यामुळे सदरची दुरुस्ती होवून मिळणेसाठी तसे हक्कज्ञापण होवून मिळणेसाठी यातील वादी यांनी सदरचा दावा दाखल केला आहे.

०४. सदर प्रकरणातील यल्लाप्पा निंगाप्पा कांबळे उर्फ माळी यांचे नावे सुळये येथे शेतजमिन मिळकती आहेत. यल्लाप्पा निंगाप्पा कांबळे उर्फ माळी हे सन १९८० साला पासून आजअखेर बेपत्ता असलेमुळे यातील वादी यांना मिळकती संबंधी दैनंदिन व्यवहार करताना ब-याच अडचणी येत आहेत. यल्लाप्पा निंगाप्पा कांबळे उर्फ माळी यांना वारस म्हणून वादी नं.१ ते ३ यांचे चुलत आजोबा तसेच वादी नं.४,५,६,७,८ व ९ चे सख्खे काका व वादी नं.७ चे दीर हेच सरळ व कायदेशीर वारस आहेत. त्यांना अन्य कोणीही सरळ व कायदेशीर वारस नाहीत. म्हणून यातील वादींनी गांव कामगार तलाठी सुळये यांचेकडे चौकशी केली तसेच ग्रामपंचायत सुळये ता.चंदगड यांचकडे चौकशी करुन यल्लाप्पा निंगाप्पा कांबळे उर्फ माळी हे मयत आहेत असे गृहित धरुन मृत्यू दाखला देणेविषयी यातील प्रतिवादी यांचेकडे विनंती केली असता यातील यल्लाप्पा निंगाप्पा कांबळे उर्फ माळी यांचे मृत्यू नोंद सन १९८० ते २०२५ पर्यंतच्या मृत्यू नोंद रजिस्टरला आढळून येत नसलेबाबत माहिती दिलेली आहे व त्यांनी सक्षम कोर्टातून आदेश आणणेस तोंडी सांगितले. कै.यल्लाप्पा निंगाप्पा कांबळे उर्फ माळी हे अविवाहीत होते व हे सन १९८० पासून बेपत्ता असलेमूळे ते कायदयाने ७ वर्षापेक्षा आधिक काळ बेपत्ता असल्यामुळे ते मयत आहेत असे ठरवून मिळावे. तसेच यल्लाप्पा निंगाप्पा कांबळे उर्फ माळी यांचे पश्यात त्यांच्या स्थावर व जंगम मिळकतीस सदर प्रकरणातील वादी नं.१ ते ९ हेच एकमेव सरळ व कायदेशीर वारस असलेबाबत हक्कज्ञापन होऊन मिळणेकरीता वादींना प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

५. प्रतिवादी क्र.१ ते ९ यांनी दाव्यास निशाणी क्र.६ अन्वये कैफियत दाखल केली आहे व दाव्यातील कथने सदर प्रतिवादीस मान्य व कबूल आहेत. प्रतिवादी क्र.१ ते ९ यांनी कैफियतीमध्ये असे कथन केले की, वादी यांनी दाखल केलेल्या दाव्यातील

कलम २ मधील मजकुर खरा व बरोबर असून सदरचा मजकुर सदर प्रतिवादी यांना मान्य व कबूल आहे.

६. वादीच्या कथनावरुन व न्यायालयीन अभिलेखावरुन खालील मुद्दे माझे विचारार्थ घेतले असून त्याचे निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे नोंदविलेले आहेत.

| | **विचारार्थ बाबी** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | कै. यल्लाप्पा निंगाप्पा कांबळे हे सन १९८० पासून बेपत्ता असलेमुळे ते कायदयाप्रमाणे मयत झालेले आहेत, हे वादी कागदोपत्री पुराव्यावरुन सिध्द करतात काय ? | होकारार्थी |
| २. | वादी नं.१ ते ९ हेच सरळ व कायदेशीर वारस आहेत हे वादी सिध्द करतो काय ? | होकारार्थी |
| ३. | वादी यांनी त्यांच्या मागणीस अनुसरून कागदोपत्री पुरावा दिला आहे काय ? | होकारार्थी |
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

७. वादी यांनी त्यांचे कथन शाबीत करणेकामी साक्षीदार क्र.१ म्हणुन स्वतःला निशाणी क्र.८, वादी नं.७ यांनी साक्षीदार क्र.२ म्हणून स्वत:ला नि.क्र.९ वर व साक्षीदार क्र.३ श्री. महादेव अनंत धुरी यांनी नि. क्र.१० वर तपासले आहे. वादी यांनी त्यांच्या कथनांच्या पुष्ट्यर्थ खालीलप्रमाणे कागदोपत्री पुरावा दाखल केलेला आहे.

| **अ.क्र.** | **कागदपत्रांचा तपशील** |
|---|---|
| १. | वटमुखत्यार पत्र |
| २. | अर्जदार यांनी ग्रामसेवक यांना पाठविलेली नोटीस |
| ३. | मृत्यू नोंद नसलेबाबतचा दाखला |

वादीने निशाणी क्र.११ येथे पुरसीस देऊन त्याचा पुरावा बंद केला आहे.

८. सदर दाव्याकामी प्रतिवादी क्र.१ ते ९ यांना समन्सची बजावणी झालेली आहे. प्रतिवादी क्र.१ ते ९ हे न्यायालयात हजर झालेले आहेत व त्यांनी कैफियत दाखल केलेली आहे.

९. प्रतिवादी क्र.१ यांनी निशाणी क्र.१२ येथे संयुक्त पुरसीस देऊन त्यांचा पुरावा बंद पुरसीस दिली आहे.

१०. दोन्ही पक्षांतर्फे करण्यात आलेला युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांतर्फे करण्यात आलेला युक्तीवाद व पुरावा न्यायनिर्णयात योग्य आणि संबंधित ठिकाणी संदर्भित केला आहे.

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र.१ ते ३ करीता

११. मुद्दा क्रमांक क्रं.१ ते ३ बाबत असलेला एकत्रीत पुरावा विचारात घेण्यात येत आहेत. येथे ही बाब नमूद करणे महत्वाचे वाटते की, भारतीय साक्षी-पुरावा अधिनियम १८७२ चे कलम १०१ अन्वये सदर प्रकरण सिध्द करण्याची जबाबदारी वादीवर आहे. त्यामुळे वादीने सदर प्रकरण सिध्द केले आहे काय हे पाहण्यासाठी न्यायालयीन अभिलेखावर उपलब्ध असलेल्या पुराव्याचे बारकाईने अवलोकन करणे गरजेचे आहे.

१२. वादीतर्फे त्याची बाजू सिध्द करण्याकरीता वादी साक्षीदार क्र.१ म्हणुन स्वतःला निशाणी क्र.८, वादी नं.७ यांनी साक्षीदार क्र.२ म्हणून स्वत:ला नि.क्र.९ वर व साक्षीदार क्र.३ श्री. महादेव अनंत धुरी यांनी नि. क्र.१० कडे तपासले. आहे. सदर साक्षीदाराच्या सरतपासाच्या शपथपत्राचे अवलोकन केले असता त्यांनी वाद पत्राप्रमाणे हुबेहुब साक्ष दिली आहे. त्यामुळे वादीने दाव्यात केलेल्या कथनांत तथ्य दिसून येते. प्रतिवादींना संधी भेटून देखील त्यांनी वादींचा उलटतपास घेतला नाही आणि स्वत:ला देखील तपासले नाही. त्यामुळे वादी तर्फे त्यांनी दाखल केलेले सर्व दस्त सिद्ध झाले व त्यास कोणीही हरकत घेतली नाही म्हणून वादींनी त्यांची केस ही संशयापलिकडे सिद्ध केलेली आहे.

१३. यामध्ये प्रतिवादींना वादी यांचे पुराव्यास हरकत असती तर त्यांनी साक्षीदाराच्या सरतपासास उलटतपास घेवून नाकारले असते परंतु तसे झाले नाही. त्यामुळे शपथपत्रामध्ये सांगितलेला सरतपासाचा मजकुर विना आव्हानित राहिलेला असलेमुळे वादीचा शपथपत्रामधील मजकुर मान्य करण्याशिवाय दुसरा पर्याय नाही.

१४. महसुल अधिनियम कलम १५७ नुसार हक्क नोंदीतील नोंदी जोपर्यंत नाशाबीत होत नाहीत, तोपर्यंत खरे असल्याचे गृहित धरावयाचे आहे. तसेच, भक्कम साक्षी पुराव्याच्या आधारे जेंव्हा गृहित धरलेले हे सत्य नाशाबीत होईल तेंव्हा या नोंदींची पुरावा म्हणून किंमत शून्य होते. वादीतर्फे अभिलेखावर दाखल करणेत आलेले कागदपत्रांवरून वादी हे कै. यल्लाप्पा निंगाप्पा कांबळे हे सन १९८० पासून बेपत्ता असलेमुळे ते कायदयाप्रमाणे मयत झालेले असून वादी नं.१ ते ९ हेच सरळ व कायदेशीर वारस आहेत असे दिसून येते. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादींना दावा समन्स मिळून केवळ प्रतिवादी यांनी न्यायालयात हजर होवून प्रस्तुत दाव्यात कैफियत देवून विरोध दर्शविला नाही. त्यामुळे वादीचा सदर पुरावा अबाधित राहिला असल्यामुळे मुद्या क्रं.१ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवून मुद्या क्रं.४ करिता खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

वादीचा दावा मंजूर करण्यात येतो.

वादी नं.१ ते ३ चे चुलत आजोबा व वादी नं.४,५,६,७,८ व ९ चे सख्खे काका व वादी नं.७ चे दीर कै.यल्लाप्पा निंगाप्पा कांबळे हे सन १९८० पासून बेपत्ता असलेमुळे ते कायदयाप्रमाणे मयत झालेले आहेत असे घोषित करणेत येते.

वादी नं.१ ते ९ हेच सरळ व कायदेशीर वारस आहेत असे घोषीत करणेत येते.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)

सही/-
**( व्ही. एस. अग्रवाल )**
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
चंदगड, जिल्हा-कोल्हापूर.

दिनांकः १६/०३/२०२६.
चंदगड.